## कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


महाराष्ट्र पोलीस — स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७०० /२०२५ दि. १८ /०५/२०२५

### –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत MMRDA मार्फत मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. कंपनी कासारवडवली ब्रिजचे काम करीत असुन ठाणे घोडबंदर वाहीनी वरुन कासारवडवली जंक्शन या ठिकाणी कासारवडवली ब्रिज जोडण्यासाठी स्टिलचे **I Grider** टाकण्याचे काम दिनांक १७/०५/२०२५ ते दिनांक २६/०५/२०२५ या कालावधीत करण्यात येणार असुन त्यावेळेस सर्व प्रकारच्या वाहनांना वाहतूकीसाठी मुख्य रस्ता बंद करावा लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १)ठाणे घोडबंदर वाहिनीवर कासारवडवली जंक्शन येथे I Grider चे काम करताना घोडबंदरच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **कासारवडवली बस स्टॉप** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** ठाणे घोडबंदर वाहिनीवर कासारवडवली जंक्शन येथे I Grider चे काम करताना घोडबंदरच्या दिशेने जाणारी सर्व प्रकारची वाहने ही कासारवडवली पेट्रोलपंप समोरील कट येथुन डावे बाजुस वळण घेवुन सर्व्हीस रोडने जावुन टायटन हॉस्पीटल येथुन मुख्य रस्त्यामार्गे इच्छित स्थळी जातील.

१) दि.१७/०५/२०२५ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि.१८/०५/२०२५ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
२) दि.१८/०५/२०२५ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि.१९/०५/२०२५ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
३) दि.१९/०५/२०२५ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि.२०/०५/२०२५ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
४) दि.२०/०५/२०२५ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि.२१/०५/२०२५ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
५) दि.२१/०५/२०२५ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि.२२/०५/२०२५ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
६) दि.२२/०५/२०२५ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि.२३/०५/२०२५ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
७) दि.२३/०५/२०२५ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि.२४/०५/२०२५ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
८) दि.२४/०५/२०२५ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि.२५/०५/२०२५ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत
९) दि.२५/०५/२०२५ रोजी रात्रौ २३.५५ वा. ते दि.२६/०५/२०२५ रोजी सकाळी ०४.०० वाजेपर्यंत

सदर वाहतूक अधिसूचना वर नमूद कालावधी दरम्यान **आय गर्डर** टाकण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

CamScanner

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner